माहितीचा अधिकार

# महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर
## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये प्राप्त झालेले व्दितीय अपील

**अपील क्रमांक : ५८२/२०२२**

**अपिलार्थी, श्री. दिनेश उमेशची फुलझेले**

विरुध्द

**जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार**
तहसिल कार्यालय, नागपूर (ग्रामीण), नागपूर

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसिलदार**
तहसिल कार्यालय, नागपूर (ग्रामीण), नागपूर

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ०३.०५.२०२४**

| | | |
|---|---|---|
| **अपीलकर्ता** | : | **उपस्थित** |
| **जन माहिती अधिकारी** | : | **उपस्थित** |
| **प्रथम अपीलीय अधिकारी** | : | **उपस्थित** |

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| ३०.११.२०२१ | निरंक | १०.०१.२०२२ | ०८.०२.२०२२ |

अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६(१) नुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे **दिनांक ३०.११.२०२१** रोजी माहितीचा अर्ज सादर केला असून त्यात त्यांनी " दिनांक १८.०८.२०२१ ला केलेल्या अर्जाच्या संदर्भात केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल देण्यात यावा" याबाबत माहिती मागितलेली आहे. सदर माहिती अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत अपिलार्थीस कोणताही प्रतिसाद दिल्याचे कागदपत्रांवरुन दिसुन येत नाही. त्यानंतर अपिलार्थी यांनी **दिनांक १०.०१.२०२२ रोजी** कलम १९ (१) नुसार प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे " दिशाभुल करणारी माहिती दिल्यामुळे " असे कारण नमूद करुन प्रथम अपील दाखल केले. त्यावर प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसिलदार नागपूर (ग्रामीण), यांनी दिनांक ०८.०२.२०२२ रोजी सुनावणी दरम्यान, अपिलार्थी यांनी दिनांक १८.०८.२०२१ रोजी दिलेल्या अर्जावर केलेल्या कार्यवाही बाबत जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, नागपूर (ग्रा.) यांनी निशुल्क माहिती उपलब्ध करुन द्यावी. तसेच यापुढे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत प्राप्त अर्जान्वये मागितलेली माहिती अचूक उपलब्ध करुन देण्याची दक्षता घ्यावी, असे आदेशीत केले.

तद्नंतर अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) नुसार आयोगाकडे **दिनांक ०३.०३.२०२२ रोजी** " दिशाभुल करणारी माहिती दिली व दिनांक १८.०८.२०२१ चे अर्जावर कुठीलीही कार्यवाही न करता प्रकरण नस्ती केले " असे कारण नमुद करून द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपीलावर आज दिनांक ०३.०५.२०२४ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली असून

सुनावणी दरम्यान अपिलार्थी ऑनलाईन उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी तसेच प्रथम्म अपिलीय अधिकारी ऑनलाईन पद्धतीने उपस्थित आहेत.

सदर प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रे व सुनावणी दरम्यान उत्तरवादी यांनी केलेल्या युक्तीवादावरुन असे निदर्शनास आले की, अपिलार्थी यांनी दाखल केलेल्या दिनांक ३०.११.२०२१ रोजीच्या जोडपत्र अ नुसार दिनांक १८.०८.२०२१ रोजी केलेल्या अर्जाच्या संदर्भात कार्यवाहीबाबतचा तपशील मागीतला असुन, वरील अर्ज दाखल केला. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी कुठलीही माहिती दिली नसल्याचा आक्षेप नोंदवित प्रथम अपील अर्ज दाखल केलेला आहे. त्यावर तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसिलदार नागपूर तहसिल कार्यालय, नागपूर (ग्रामीण), यांच्या समोर झालेल्या सुनावणीत तत्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांचा युक्तीवाद नोंदविला असुन, अर्जाच्या अनुषंगाने, दाखल अर्जाच्या संदर्भात केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल तसेच उपलब्ध माहिती अपिलार्थी यांना देण्यात आली असुन, पारित करण्यात आलेले आदेश अपिलार्थी यांना देण्यात आले असल्याचे नमूद करुन, दिनांक १८.०८.२०२१ रोजी शेतात जाण्या-येणाऱ्या रस्त्यावरील दिलेल्या अर्जावर केलेल्या कार्यवाही बाबतची माहिती अनुषंगाने दिनांक १३.०९.२०१९ तसेच दिनांक २७.०९.२०२० रोजी त्याच विषयाच्या अर्जाच्या अनुषंगाने, दाखल प्रकरणात पारित आदेशाची प्रत उपलब्ध करुन दिली असल्याचे आढळुन येते. असे असले तरी दिनांक १८.०८.२०२१ रोजीच्या अर्जावर केलेल्या कार्यवाहीची माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक असल्याचे नमुद करीत, जन माहिती तथा नायब तहसिलदार नागपूर (ग्रामीण), यांनी माहिती निशुल्क उपलब्ध करुन द्यावी, तसेच यापुढे माहितीचा अधिकारी अधिनियम-२००५ अंतर्गत प्राप्त अर्जावर मागितलेली माहिती विहित मुदतीत उपलब्ध करुन देण्याची दक्षता घ्यावी, असे निर्देशीत केलेले आहे.

त्याविरुध्द अपिलार्थी यांनी दिनांक ०३.०३.२०२२ रोजी माहिती अधिकारात अर्ज दाखल करुन त्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असल्याचे कारण नमुद करुन प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज दाखल केला असुन, एकुण चार लक्ष रुपयांचे आर्थीक मानसीक नुकसान झाले असल्याचा दावा देखील यात केलेला आहे. तसेच दिशाभुल करणारी माहिती दिली व दिनांक १८.०८.२०२१ रोजीच्या अर्जावर कुठलीही कार्यवाही न करता प्रकरण नस्ती करण्यात आले, असेही यात नमुद करण्यात आलेले आहे. याउलट विद्यमान जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार नागपूर यांचे वतीने अपिलार्थी यांना दिनांक ०३.०२.२०२२ रोजी उपलब्ध असलेली माहिती प्रदान करण्यात आली असल्याचे, नमुद करण्यात आले असुन, वरील पत्रात अपिलार्थी यांना दिनांक १३.०९.२०१९ व दिनांक ०४.०९.२०२० व दिनांक २७.०१.२०२० या दिवशी प्राप्त झालेले पत्र पारित झालेले आदेश हे एकमेकाशी निगडीत असल्यामुळे याबाबत, यापुर्वीच आदेश पारित झाला असल्यामुळे दिनांक १८.०८.२०२१ रोजीच्या अर्जात कुठलीही कार्यवाही करण्यात आलेली नसुन, ते प्रकरण नस्तीबध्द करण्यात आले असल्याचा प्रतिसाद दिला आहे.

अपिलार्थी यांनी प्रस्तुत प्रकरणात त्यांच्या तक्रार अर्जाच्या अनुषंगाने, प्रत्यक्षात कार्यवाहीची अपेक्षा असुन, माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ कलम २ (च) नुसार माहिती या शब्दाची व्याप्ती माहिती अधिकार अधिनियमातील तरतूदीनुसार एखादया विषयावर सल्ला मागणे, एखादी कार्यवाही पूर्ण करुन माहिती देणे, एखादया कार्यवाही मागील खुलाशा अथवा कारण देणे, प्रश्नार्थक माहिती देणे, एखादया कार्यवाहीची अपेक्षा करणे इत्यादी बाबीचा या व्याख्येमध्ये समावेश होत नाही.

राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर

या प्रकरणात विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना दिनांक ०७.०१.२०२२ रोजी तसेच दिनांक ०३.०२.२०२२ रोजी प्रतिसाद दिला असुन, प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या ०८.०२.२०२२ रोजीच्या आदेशोत्तर उपलब्ध असलेली माहिती प्रदान केली असल्याचे नमूद केलेले आहे. वरील माहिती अद्यापही अप्राप्त असल्याचा अपिलार्थी यांनी दावा केला असुन, त्या अनुषंगाने, आज सादर केलेल्या खुलाशाचे तसेच अपिलार्थी यांना याआधीच प्रदान करण्यात आलेल्या माहितीची एक (१) प्रत पुन:श्च एकदा विनामुल्य प्रदान करण्याच्या निर्देशासह, प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर विभाग ★नागपूर★

**(राहुल भा.पांडे)**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ नागपूर**

**ठिकाण : नागपूर**
**दिनांक : ०३.०५.२०२४**

जावक क्रमांक 4929 दिनांक 5 AUG 2024